# थकबाकीदारांच्या छायाचित्रास वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दी

शनिवार दिनांक ३० नोव्हेबर २०१३ रोजी **लोकसत्ता** या वृत्तपत्रामध्ये पान क्र. १४ वर



''**थकबाकीदारांचे छायाचित्र बँक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करू शकते**'' या मथळ्याखाली उच्च न्यायलयाचा निर्वाळा प्रसिध्द झाला आहे. न्यायमुर्ती मा. विद्यासागर कानडे आणि न्यायमुर्ती मा. एम. एस. सोनाक यांच्या खंडपिठाने **डी. जे. एक्झीम** ही **कंपनी** आणि तिच्या संचालकांना अंतरिम दिलासा देण्यास नकार देताना हा निर्वाळा दिला आहे. .

बातमीप्रमाणे **स्टेट बँक ऑफ इंडियाने** १० ऑक्टोंबर रोजी कंपनीला पत्र देवुन कर्जाची रक्कम परत केली नाही तर, कंपनीच्या संचालकांची छायाचित्रे राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्याचा इशारा दिला होता. परंतु असे करण्याचा बँकेला अधिकार नसल्याचा दावा करीत कंपनीने त्या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. कायद्याच्या व नियमांच्या नावाखाली बँक असे करु शकत नाही असेही कंपनीने याचिकेत म्हटले होते. परंतु **कंपनीवर ५३ कोटी रूपयांचे कर्ज असून ते थकबाकीदार आहेत हे कंपनीने मान्य केलेले आहे.** त्यामुळे **ही बाब लोकांना माहित असणेही गरजेचे असल्याचा युक्तीवाद बँकेकडून करण्यात आला.** तसेच बँकेतर्फे प्रत्येक प्रकरणात असे करण्यात येत नाही असेही स्पष्ट करण्यात आले. न्यायालयाने त्यांचे म्हणणे मान्य करीत **बँकेला जनजागृती करण्याचा आणि ग्राहकांचा विश्वास सार्थ ठरविण्याचा अधिकार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.** आणि कंपनी तसेच तिच्या संचालकांना दिलासा देण्यास नकार दिला.

वरील थकबाकी प्रकरणावरून एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, ''**जे थकबाकीदार आहेत त्यांची माहिती जनतेला माहित असणे गरजेचे आहे.**'' याचाच अर्थ असा की, **कुठल्याही प्रकारच्या वित्तीय संस्थेमध्ये भाग, ठेव व शासकीय अनुदानाद्वारे प्राप्त / मिळवलेली रक्कम ही जनतेची मालमत्ता आहे.** आणि त्या रकमेतून

वाटप केलेल्या कर्जाची रक्कम थकीत झाल्यास त्या थकबाकी वसुलीसाठी त्या वित्तीय संस्थेने भारतीय राज्य घटनेच्या सर्व नियम व कायद्यांना अधिन राहून थकबाकी वसुलीचे लोकशाहीतील सर्व मार्ग त्या त्या वेळेस कुठलीही कुचराई न करता १०० टक्के अवलंबविले पाहिजेत. मग अशा वेळी थकबाकीदार त्यांचेवर वसुलीसाठी कारवाई होवू नये, किंबहुना कारवाई केली तर वित्तीय संस्थाच कशी चूक आहे, अशी भुमिका स्विकारणाऱ्यांच्या विरोधात मा. उच्च न्यायालयाचा हा निर्वाळा आपल्या देशातील वित्तीय संस्थांना सशक्त करण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

अलीकडच्या काळात **थकबाकीदारांनी लोकशाहीच्या त्यांच्या अधिकाराचे अस्त्र पुढे करून कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांनाच कोंडीत पकडण्याचे कट कारस्थान रचलेले दिसते.** त्यामध्ये ''मुळ मुद्दा कर्जदाराने कर्ज घेतले किंवा नाही'' हा आहे. मग तो कर्जदार पतसंस्थेचा किंवा कुठल्या बँकेचा असो. **कर्जदाराने वित्तीय संस्थेकडे कर्ज अर्जच केला नसेल, कर्जासोबत स्वतःची कागदपत्रेच दिली नसतील व कर्ज घेतलेल्या कागदपत्रावर सह्याच घेतल्या नसतील तर कर्जदार मी / आम्ही हे कर्जच घेतले नाही असे म्हणू शकण्यास वाव ठरतो.** परंतु आपल्या प्रगत महाराष्ट्र राज्यात असे नीच व दुष्ट काम करणाऱ्यांना बिलकूल थारा नाही. पतसंस्था ह्या महाराष्ट्र सहकारी संस्थां अधिनियम १९६० च नियम १९६१ नुसार तसेच बँका बँकीग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ तसेच सहकार कायद्यानुसार चालतात. वरील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या थकबाकीदारांच्या संदर्भात उच्च न्यायालयाचा निर्वाळा पतसंस्था व बँका ह्या सर्व वित्तीय संस्थांसाठी फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी ज्या पतसंस्था / बँकांना थकबाकीने ग्रासलेले आहे, त्यांनी थकबाकी वसुल करण्यासाठी जराही कच खाता कामा नये. अर्थात हे सर्व करण्यासाठी कायदा तुमच्याबरोबर आहे हे बघून कारवाया करणे व थकबाकीदारांची चारही बाजूनी नाकेबंदी करून जनतेला त्यांची माहिती करून देणे ही नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे.

**राज्यातील सहकारी पतसंस्था व विविध नागरी / जिल्हा सहकारी बँका तसेच राज्य सहकारी बँक या सर्वांनी मा.उच्च न्यायालयाच्या या निर्वाळ्याचे युध्द पातळीवर**

**समीक्षण करून मा. सहकार सचिवांमार्फत मा. सहकार आयुक्त यांना या प्रकरणी योग्य ते आदेश संबंधित पतसंस्था व बँकांच्या व्यवस्थापनांना देणे आवश्यक आहे.**

**शासनाने थकबाकीदारांच्या वसुलीसाठी विहीत कार्यप्रणालीचे आदेश जर सर्व सहकारी वित्तीय संस्थांना म्हणजेच सहकारी पतसंस्था , नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, राज्य सहकारी बँक इत्यादीसाठी पारित केले** तर या राज्यातील सहकार व सहकारातील सभासद तसेच ठेवीदारांचा विश्वास खऱ्या अर्थाने सहकार चळवळ वृध्दींगत होण्यासाठी होणार आहे. शासन ह्या एका परिपत्रकाने राज्यातील पतसंस्था व बँका थकबाकीदारांच्या बाबतीत खालील कारवाई करण्यासाठी कृती आराखडा देवू शकते.

**एन. पी. ए. (अनुत्पादक कर्जे ) झालेल्या थकीत कर्जदारांसाठी**

१. वैयक्तीक थकीत कर्जदार त्यांचे जामीनदार, कंपन्या व त्यांचे भागीदार तसेच सहकारी संस्था व त्यांचे संचालक मंडळ यांचे संपुर्ण नाव, राहण्याचा संपुर्ण पत्ता, वय, घेतलेले कर्ज रक्कम रूपये, कर्जाची तारीख, तारणाचा तपशील, थकबाकी झाल्याची तारीख, थकबाकीची रक्कम इत्यादी आवश्यक सर्व बाबी पतसंस्था व बँकांनी त्यांच्या **वार्षिक अहवालात प्रसिध्द करणे आवश्यक आहे**.

२. वैयक्तीक थकीत कर्जदार त्यांचे जामीनदार, कंपन्या व त्यांचे भागीदार तसेच सहकारी संस्था व त्यांचे संचालक मंडळाच्या विरोधात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार **कलम १०१ व कलम ९१ अंतर्गत दावे दाखल करून विहित वेळेत अवॉर्ड मिळणेसाठी योग्य ती विहित वेळेत कार्यवाही करणे व संबंधीत यंत्रणेने विहित वेळेत त्याचे निवाडे / आदेश देणे. त्यासाठी आवश्यकतेनुसार त्या त्या कायद्यांमध्ये त्वरीत बदल करणे.**

३. ज्या पतसंस्था / बँकांनी कर्जदारांकडून कर्ज परत फेडीचे पोस्ट डेटेड धनादेश घेतलेले आहेत, त्यांनी ते धनादेश त्या - त्या तारखेलाच बँकेत भरणे आवश्यक आहे. जर तो **धनादेश वटला नाही तर संबंधितांच्या विरोधात निगोशिएबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट १८८१ नुसार**

**कलम १३८ अंतर्गत विहित वेळेत गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे.**

४. वैयक्तीक थकीत कर्जदार त्यांचे जामीनदार, कंपन्या व त्यांचे भागीदार तसेच सहकारी संस्था व त्यांचे संचालक मंडळ यांच्या विरूध्द प्राप्त झालेले **कलम ९१, कलम १०१ व निगोशिएबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट १८८१ नुसार कलम १३८ अंतर्गत प्राप्त झालेले अवॉर्डस् वेबसाईटवर सर्व तपशीलांसह प्रसिध्द करणे आवश्यक आहे.**

५. वैयक्तीक थकीत कर्जदार त्यांचे जामीनदार, कंपन्या व त्यांचे भागीदार तसेच सहकारी संस्था व त्यांचे संचालक मंडळ यांची छायाचित्रे **प्रसिध्दी माध्यमांतून** त्यांनी थकविलेल्या /संपुर्ण येणे व्याज व इतर रकमेचा आकडा देवून आम जनतेला हे माहिती करून देणे आवश्यक आहे.

६. वैयक्तीक थकित कर्जदार त्यांचे जामीनदार, कंपन्या व त्यांचे भागीदार तसेच सहकारी संस्था व त्यांचे संचालक मंडळ यांनी पतसंस्था व बँकाकडून कर्जे घेण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर करणे, वित्तीय संस्थांची फसवणूक करून बोगस लोकांच्या नावे कर्जे घेवून रकमा सायफन करणे, दबाव आणणे इत्यादी **फौजदारी स्वरूपाच्या कृत्याच्या विरोधात सर्व संबंधितांवर भारतीय दंड विधानाच्या अंतर्गत त्वरीत फौजदारी गुन्हे दाखल करून त्याचा शिघ्र गतीने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.**

७. **वरील सर्व गोष्टी वित्तीय संस्थांनी करताना त्यासाठी लागणारा खर्च, मन्युष्यबळ याची भरपाई संबंधित थकबाकीदारांकडूनच वसुल करण्यात यावी व ते एक प्रकारचे येणे दाखवावे.**

वरील सर्व प्रकारची सुचित केलेली **थकबाकी वसुलीची प्राणाली शासनाने जनतेच्या / सभासद ठेवीदारांच्या आर्थिक रक्षणासाठी करणे आवश्यक आहे.** आणि ह्या सर्व गोष्टी सुप्रिम कोर्ट, उच्च न्यायालय व इतर विविध न्यायालयांच्या अनेक आदेशांच्या पुरक निर्वाळ्यांच्या आधारे व कायद्याच्या आधारे सरकार सहजपणे करू शकते.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**